**नि.दि.दा.क्र. ५६/२०१८** **नि. क्र.६२**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास वादी तर्फे वकील श्री. अग्रवाल यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

१४. माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर मला वाचून दाखविला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहीलेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.६२ देण्यात येते.

१५. मी यादी निशाणी ०४ सोबत कागदपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.६ यांनी सदर यादीमधील अनुक्रमांक २, ६ ते ९ हे कागद मान्य केल्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि.क्र.५७ ते ६१** देण्यात येते. आता मला यादी निशाणी ०४ सोबत अनु.क्र.१ वर दाखल माझे चुलत भाऊ महेश कांताप्रसाद अग्रवाल यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत दाखविली. त्याला **नि.क्र.६३** देण्यात येत आहे. आता मला यादी निशाणी ०४ सोबत अनु.क्र.५ वर दाखल माझे चुलत भाऊ महेश कांताप्रसाद अग्रवाल यांची इयत्ता पाचवीची मुळ गुणपत्रीका दाखविली. त्याला **नि.क्र.६४** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –२८/०८/२०२४ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१,२,४ व ५ तर्फे वकील श्री. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१६. मी प्रस्तुतचा दावा वाटणीसाठी केलेला आहे. मी दावा मिळकत घर क्र.एनएल ५५–ए चा मालक आहे हे दाखविणारा कागद म्हणजेच कर पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. दावा मिळकत घर क्र.एनएल ५५–ए हे सरकारी आहे किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. दावा मिळकतीची मी कधीही मोजणी केलेली नाही. दावा मिळकतीचे क्षेत्रफळ ६०० चौ.फु. आहे हे दाखविणारा कागद मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता त्यात तसा कुठलाही कागद दिसून आलेला नाही. आता मला नि.क्र.५८ कर पावती दाखविली, त्यामध्ये कोणत्याही वादीचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की वादी दावा मिळकतीचे मालक नाही त्यामुळे त्यासंबंधीचे कागदपत्र अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीचे क्षेत्रफळ ६०० चौ.फु. नाही व त्यामुळे त्यासंबंधीचा कुठलाही कागद अभिलेखावर दाखल केला नाही. दावा मिळकतीचे क्षेत्रफळ ४०८ चौ.फु. आहे हे दाखविणारा कागद मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता त्यात तसा कुठलाही कागद दिसून आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीचे क्षेत्रफळ ४०८ चौ.फु. आहे हे दाखविणारा कुठलाही कागद अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत ही नझुलच्या जागेवर बांधलेली आहे. दावा मिळकत आमच्या नावे करण्यासाठी मी संबंधीत कार्यालयात कोणताही अर्ज केलेला नाही. प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापूर्वी मी संबंधीत विभागाला प्रस्तुतचा दावा मी सरकारी जागेबद्दल दाखल करीत आहे हे सांगण्याकरीता नोटीस दिली नव्हती. प्रस्तुतच्या दाव्यात मी सरकारी विभागाला पक्षकार केलेले नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की पूर्वी दावा मिळकत माझे आजोबा लक्ष्मीचंद अग्रवाल यांच्या नावे होती. कांताप्रसाद अग्रवाल यांना दोन भाऊ नामे हरीशंकर व राधेश्याम होते. मिनामल लक्ष्मीचंद अग्रवाल हे कांताप्रसाद अग्रवाल यांचे भाऊ होते. साक्षिदार स्वतःहून सांगतो की मिनामल अग्रवाल हे अविवाहीत होते व त्याच्या जन्मापूर्वी मयत झाले होते. प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापूर्वी मला माहित होते की मिनामल अग्रवाल हे कांताप्रसाद अग्रवाल यांचे भाऊ होते, परंतु मी सांगण्यास विसरलो होतो. कांताप्रसाद अग्रवाल हे सन २००१ मध्ये मयत झाले. दावा मिळकत माझे काका कांताप्रसाद अग्रवाल यांनी बांधली होती हे दाखविणारा कागद मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी सुध्दा दावा मिळकतीचा कर लक्ष्मीचंद अग्रवाल यांच्या नावाने येतो. कांताप्रसाद अग्रवाल यांनी त्याच्या हयातीत दावा मिळकतीचा ताबा मला दिला होता हे दाखविणारा कुठलाही कागद मी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१८. मी आज रोजी सहाही वादींतर्फे साक्ष देत आहे. वादी क्र.५ चे जन्म वर्ष अंदाजे २००८ व वादी क्र.६ चे जन्म वर्ष अंदाजे २०१०–२०११ आहे. वादी क्र.४ उमा राजेंद्र अग्रवाल ही माझी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की कांताप्रसाद अग्रवाल यांनी त्यांच्या हयातीत वादींना दावा मिळकतीचा ताबा दिला नव्हता त्यामुळे मी अभिलेखावर त्याबाबतचा कागद दाखल केला नाही. महेश अग्रवाल हे कांताप्रसाद अग्रवाल यांचा मुलगा होता. महेश अग्रवाल हे दावा मिळकतीत

राहत होते. महेश अग्रवाल हे सन २०१८ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की वादी हे बेरोजगार होते, त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नव्हते त्यामुळे त्यांनी दावा मिळकतीत व्यवसाय सुरु केला. मी सदर व्यवसायाबाबतचा कुठलाही कागद अभिलेखावर दाखल केलेला नाही कारण तो हंगामी व्यवसाय होता. हे म्हणणे खरे आहे की सदर व्यवसाय मी कधी पासून ते कधी पर्यंत केला याबाबत माझ्या पुराव्याचे शपथपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दावा मिळकतीत कधीही व्यवसाय केला नाही त्यामुळे त्याबाबतचे कागद अभिलेखावर दाखल केले नाही. दावा मिळकतीची देखरेख मी २० वर्षापासून करत आहे हे दाखविणारा कुठलाही कागद मी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**प्रतिवादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा

ठिकाण –कामठी

दिनांक –०७/११/२०२४

(राजेश र. शेरेकर)

२रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.

**वादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१,२,४ व ५ तर्फे वकील श्री. काळे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रा मधील परिच्छेद क्र. ४ मधील शेवटच्या दोन लाईन चुकीच्या लिहीलेल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्याचे शपथपत्रा मध्ये दि. ११.०५.२०१८ रोजी प्रतिवादी, वादी व इतर नातेवाईकांमध्ये मिटींग झाली होती असे खोटे लिहीले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्याचे शपथपत्रा मध्ये परिच्छेद क्र. ५ मध्ये अंत्यसंस्काराच्या कार्यक्रमाच्या वेळेस प्रतिवादी व इतर नातेवाईक यांनी वादी क्र. १ हा काम करीत नसल्यामुळे दावा मिळकतीचा दावा त्याच्या कडे राहील असे खोटे लिहीले आहे. दि. ११.०५.२०१८ रोजीच्या मिट्रींग मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ५ या पैकी एक प्रतिवादी हजर नव्हता, त्याचे नाव माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११.०५.२०१८ नंतर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी ते वादीच्या ताब्यात दिलेल्या दावा मिळकतीबाबत हस्तक्षेप करणार नाही असे म्हटले नव्हते.

२०. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुराव्याचे शपथपत्रा मध्ये परिच्छेद क्र. ६ मध्ये जून २०१८ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीचे छत पाडल्याचे खोटे लिहीले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ मनीष याने दावा मिळकतीत कधीही बांधकाम केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत बेकायदेशीररीत्या बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सध्या दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. १ व २ यांचे बांधकाम सुरू नाही.

२१. दि. ०४.०६.२०१८ रोजी काय झाले होते हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे पुराव्याचे शपथपत्रात परिच्छेद क्र. ७ व ८ मध्ये चुकीचा मजकूर लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सध्या प्रतिवादी क्र. १ ते ५ दावा मिळकत विकण्याचा तयारीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींचा दावा मिळकतीत अर्धा हिस्सा नाही. प्रतिवादी क्र. ७ ते १२ व वादी क्र. ४ ते ६ यांनी दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा सोडला याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की हक्क सोडल्याबाबत तोंडी ठरले होते.

२२. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र. १ व २ यांचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे जून २०१८ पासून दावा मिळकतीवर दुकान

चालवत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १ ते ३ यांचा दावा मिळकतीवर कधीही ताबा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादी क्र. १ ते ३ यांना दावा मिळकतीतून कधीही काढले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दावा मिळकतीचे मालक आहे. साक्षदार स्वतःहून सांगतो की तो दावा मिळकतीत अर्धा हिस्याचा मालक आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.12.05 18:04:21 +0530

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –०५/१२/२०२४ २रे सह. दि. न्यायाधीश कनिष्ठस्तर, कामठी.